# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 08/10/2021 (शुक्रवार)
(सकाळ)

---

### रेती चोरी करणाऱ्या आरोपीला अटक

पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत 02 कि.मी. अंतरावरील अन्नामोड चौक येथे दिनांक 07/10/2021 चे 01.45 वा. दरम्यान एम.एच– 40/ एन– 132 क्रमांकाच्या ट्रकचा चालक आरोपी नामे– राजु उर्फ राजेश किष्णाजी मेश्राम वय 39 रा भानेगाव वार्ड क्र 4 ता सावनेर जि नागपुर याने त्याच्या ताब्यातील वाहनात विना परवाना अवैधरित्या 2 ब्रास रेती किं. 8,000/– रू. ची भरून वाहतुक करतांना मिळुन आला. वाहनासह एकुण 3,08,000/–रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस शिपाई आशिष रडके यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला सुचनापत्रावर रिहा करण्यात आले असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार काटे हे करीत आहे.

### चोरी

पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत 01 कि.मी. अंतरावरील राशी पेट्रोलपंप जवळ अडाळयवाले लेआउट उमरेड येथे दिनांक 07/10/2021 चे 01.57 वा. दरम्यान दोन अज्ञात आरोपीतांनी उमरेड येथील राशी पेट्रोलपंपला लागुन फिर्यादी नामे– सुभाष कृष्णराव हरडे वय 56 वर्ष, रा. जागिठाणा पेठ उमरेड यांचे नविन दुकानाच्या बांधकामा समोर उभी असलेली त्यांची एम.एच.– 40/4365 क्रमांकाची मिनी महिंद्रा मॅक्स पिकअप गाडी किमती 3,00,000/–रूपये ची चोरून नेली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम 379, 34 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार संजय कुलकर्णी हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर